माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 19 (3) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : 2371/2019**

**अपिलार्थी, श्री. श्रीधर ज्ञानेश्वर तराळे,**
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर-01

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यालय अधिक्षक,

शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर-01

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा** व्यवस्थापक,

शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर-01

**आदेश पारित दिनांक : 28.10.2020**

अपिलार्थी यांनी दिनांक **21.08.2019** रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19(3) नुसार आयोगाचे स्तरावर द्वितीय अपील अर्ज दाखल केला. त्याची आयोगाचे स्तरावर रीतसर नोंदणी करण्यात आली. आयोगाकडे दाखल केलेल्या प्रस्तुतच्या व्दितीय अपील अर्जाच्या अनुषंगाने आयोगाकडून जा.क्र. 3252/2020, दि. 08.09.2020 रोजीच्या पत्रान्वये ई-मेल व्दारे उत्तरवादींना नोटीस देवुन त्यांचे खुलासे मागविण्यात आले. त्यानुसार उत्तरवादी यांचेकडून खुलासे प्राप्त झाले. त्याअनुषंगाने सदर प्रकरणात गुगल मीट या ॲप्लिकेशनवर व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे वास्तविक सुनावणी घेण्यासाठी लिंक कोड पुरवून आज दिनांक 28.10.2020 रोजी संबंधितांना ऑनलाईन सुनावणीस बोलविण्यात आले. आजच्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, श्री. पु.सु. वाघमारे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक, श्री. सु.प्रे. मेश्राम उपस्थित आहेत.

प्रकरणाची वस्तुस्थिती तपासली असता, अपिलार्थी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 6(1) नुसार दिनांक **04.04.2019** रोजी माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दाखल केला होता. त्यामधून त्यांनी " मानक/नियोजन विभाग शासकीय मुद्रणालय, नागपूर येथील कार्यरत असलेल्या (इतर विभागातून सुध्दा आलेल्या) कर्मचा-यांनी 1 जाने. 2014 ते 31 मार्च 2019 पर्यंत केलेल्या अतिकाळाची माहिती, प्रतयेक महिन्याप्रमाणे किती तास अतिकाळ (सिंगल-डबल तास) दिला व मासिक किती रक्कम त्यांना अदा करण्यात आली तसेच त्यांना किती रक्कम द्यावी लागणार आहे (कर्मचा-यांचे नाव व पदनामासह) " इ. माहिती मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक 04.05.2019 अन्वये, श्री. अ.वं. मानेकर, सहा. मानक/नियोजन यांची अतिकालाबाबतची माहिती देण्यात येऊन इतर कर्मचारी यांनी माहिती देण्यास मनाई केल्याने सदर माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही, असा अपिलार्थीस प्रतिसाद दिला. सदर प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी दिनांक **06.05.2019** रोजी कलम 19 (1) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती अपुरी, असमाधानकारक व दिशाभूल करणारी दिली" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक 10.06.2019 रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक 04.05.2019 रोजी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिलेली असून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 च्या पोटकलम ञ नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मानक/नियोजन विभागातील कार्यरत ज्या कर्मचा-यांना कार्यालयाने पत्राव्दारे विचारणा केल्यावर ज्यांनी माहिती देवू नये असे कळविले. त्यांची माहिती देवू नये, व ज्यांनी कार्यालयास काहीही लेखी उत्तर कळविले नाही अशा कर्मचा-यांची माहिती अपिलार्थी यांना देण्यात यावी, असे आदेशित केले. तदनंतर अपिलार्थी यांनी दिनांक **21.08.2019** रोजी कलम 19(3) नुसार आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज दाखल करुन "माहिती अपुरी व असमाधानकारक" असा मुद्दा उपस्थित केला आहे.

आज गुगल मीट ॲपवरील ऑनलाईन सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी व्दितीय अपीलात उपस्थित केलेला मुद्दा व

त्याअनुषंगाने उत्तरवादी यांनी आयोगास सादर केलेल्या खुलाशावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात मानक/नियोजन विभागातील अतिकालाची माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी हे मानक/नियोजन विभाग, शासकीय मुद्रणालय, नागपूर येथील कर्मचारी असून त्यांनी त्याच विभागातील इतर कर्मचा-यांची ओव्हरटाईम संबंधात माहिती मागितेली आहे. अपिलार्थी यांनी काही ठराविक कर्मचा-यांनाच ओव्हरटाईम दिला जात असल्याने माहिती अधिकारात माहिती मागितलेली असल्याचे कथन केले. त्याअनुषंगाने अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती प्राप्त झालेली असल्याचा व्दितीय अपीलात मुद्या उपस्थित केलेला आहे. सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये, कार्यालयातील काहीच महाभागांना अतिकलीक भत्ता मिळेल अशी कार्यालय प्रमुख योजना करतात व काहीच आवडीच्या कर्मचाऱ्यांचे हितसंबंध जोपासतात. म्हणून कार्यालयातील वंचित कर्मचारी माहितीच्या अधिकारात माहिती मागतात. परंतु लाभार्थी कर्मचारी अशी माहिती संपूर्णपणे सार्वजनिक असून देखील उघड करण्यास विरोध करतात व कार्यालय प्रमुख देखील त्यांचेच हितसंबंध अबाधित राखण्यासाठी माहिती उघड करण्यास मनाई करतात हे बरोबर नाही. याना सार्वजनिक की वैयक्तिक माहिती यातील भेद कळू नये हे आणखी अत्यन्त दुर्दैवी आहे. वास्तविक कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना समान अतिकलीक कामकगे वाटप करणे हे कार्यालय प्रमुखाने कर्तव्य आहे. मात्र ते तेथे चुकतात. अपिलार्थिकडून आवेदीत माहितीमध्ये सार्वजनिक हित गुंतलेले असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस संपूर्ण माहिती देय ठरते. सबब, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 19(10) नूसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

1. **विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ मधील संपूर्ण माहिती अपिलार्थीस तात्काळ विनामुल्य प्रदान करावी व तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. तसेच** अपिलार्थीस माहिती न मिळाल्यास त्यांचा माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम 18(1) अंतर्गत तक्रार करण्याचा हक्क अबाधित ठेवण्यात येत आहे.

2. **उपरोक्त आदेशान्वये, प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(संभाजी सरकुंडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

जावक क्रमांक 1154 दिनांक ~~28-Mar-~~2021

08 APR 2021